Vol 2 Issue 2 Nov 2012

ISSN No : 2249-894X

Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

Ashok Yakkaldevi
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *Advisory Board*

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

**Review Of Research**
Vol.2,Issue.2 ,Nov; 12pp.1-4
**ISSN:-2249-894X**

Available online at www.reviewofresearch.net

RESEARCH PAPER

# पं. नेहरुंचा स्त्री शिक्षणाविषयीचा दृष्टिकोन

*अनिल माणिकराव बैसाणे*

झेड् बी. पाटील कॉलेज, देवपूर, धुळे .

***सारांश :-***

पंडित जवाहरलाल नेहरुंचा मानवतावादी तत्त्वज्ञ, प्रखर राष्ट्रवादाची जपणूक करणारा महान देशभक्त, आंतरराष्ट्रीय मुत्सद्दीपणा असलेला नेता, मानव हा केंद्रबिंदू मानून पुरोगामी विचारांची रुजवण करणारा महान विचारवंत, ब्रिटिश उदारमतवादाचा स्वीकार करणारा थोर उदारमतवादी नेता, मार्क्सवादाचे आकर्षण असलेला मात्र सशस्त्र क्रांतीऐवजी म. गांधींच्या अहिंसावर श्रद्धा ठेवणारा महान कल्पक म्हणून राजकारण निष्णात असलेल्या पं. नेहरुंची या देशाच्या जडणघडणीत आणि उभारणीतील भूमिका फार महत्त्वाची आहे. म्हणूनच त्यांचा आधुनिक भारताचे शिल्पकार म्हणून गौरव केला जातो.

***प्रस्तावना :-***

अशा थोर राष्ट्र निर्मात्याचा जन्म नोव्हेंबर 1889 मध्ये काश्मीरमधील एका ब्राह्मण कुटुंबात झाला. आई स्वरुपाराणी तर वडील मोतीलाल नेहरु यांचा समृद्ध वारसा त्यांना मिळाला होता. केंब्रिज विद्यापीठातून उच्चशिक्षण व पुढे बॅरिस्टर होवून ते भारतात परतलेत. लोकमान्य टिळक व डॉ. ॲनी बेझंट यांच्या होमरुल चळवळीत सहभाग, पुढे म. गांधींच्या सत्याग्रही चळवळीत सहभाग घेतला. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसला एक तरुण नेतृत्व मिळाले. इ.स. 1947 मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पहिले पंतप्रधान म्हणून त्यांनी सूत्रे हाती घेतलीत. आपले आई—वडील, म.गांधी, मानवेंद्रनाथ रॉय, मार्क्स, मिल, ग्लॅडस्टन, रसेल, बर्नाड शो यांच्यासारख्या अनेक विचारवंत, नेत्यांच्या विचारांचा आणि कृतीचा प्रभाव होता. लेटर्स फ्रॉम दी फायर टू हिज डॉटर्स, सोव्हिएट रशिया जवाहरलाल नेहरु : ॲन ऑटोबायग्राफी, ग्लिम्प्सिस ऑफ दी वर्ल्ड हिस्टरी, डिस्कव्हरी ऑफ इंडिया, ए बंच ऑफ ओल्ड लेटर्स, डेमॉक्रसी कम्युनिझम, सोशॅलिझम ॲण्ड कॅपिटालिझम, रोझ पेटल्स, इत्यादी अनेक ग्रंथांमधून त्यांचे विचार आपल्याला पहायला मिळतात.

***स्त्री शिक्षण***

स्त्री शिक्षणाविषयीची पंडित नेहरुंची भूमिका अतिशय व्यापक होती. ज्या पालकाने आपल्या मुलीस दिलेल्या शिक्षणाने या देशाच्या पहिल्या स्त्री पंतप्रधानाचा सन्मान मिळवून दिला, त्या पालकाच्या म्हणजेच नेहरुंचा स्त्रीशिक्षणाविषयीचा दृष्टिकोन किती उदात्त होता याची कल्पना येते. इंदिरा गांधी अवघ्या 10 वर्षाच्या असतांना इ.स. 1928 मधील उन्हाळ्यात हिमालयात मसूरीला होत्या. त्यावेळी अलाहाबादहून नेहरुजींनी पाठविलेली पत्रे जर पाहिलीत तर भारताच्या इतिहासाचं शिक्षण त्यांच्यातून आपल्या कन्येस दिले असल्याचे लक्षात येते. समाजातील शोषित वंचितांबरोबरच स्त्रियांनाही इतिहास असल्याचे नेहरुंच्या या चिंतनातून स्पष्ट होते.[1]

पत्र क्र. 24 मध्ये नेहरु असं म्हणतात की, ''इतिहास म्हणजे काही लढाया व जे थोडेसे लोक राजे व सेनापती झाले त्यांच्या हकीकतींनी बनत नाही. इतिहासामध्ये एखाद्या देशातील रहिवाशांची सर्व माहिती आली पाहिजे. त्या लोकांची राहणी कशी होती, त्यांनी कोणती कृत्ये केली, त्यांची विचारसरणी कशी होती, त्यांची सुख—दुःखे कोणती होती, त्यांच्यावर कोणती संकटे आली व त्यांनी त्यांचा कसा प्रतिकार केला, इत्यादी गोष्टींचा खुलासा त्यात झाला पाहिजे. ह्या पद्धतीने जर आपण इतिहास शिकलो तर त्यापासून आपला फायदा होईल.''[2] असा सबाल्टर्न हिस्ट्रीचा विचार नेहरुंनी सांगितला. या विचारातून इंदिराजींची झालेली जडण—घडण ही महत्त्वाची वाटते.

नेहरुंनी इंदिराजींना लिहितांना वेळो—वेळी महत्त्वाचे वैचारिक प्रबोधन होईल असा प्रयत्न केल्याचे दिसते. ते म्हणतात की, नशिबाने काहीही घडत नसते ते आपल्याला स्वतःच जिद्द आणि मेहनतीनं मिळवावं लागतं. आपणास

मानसिक आणि शारीरिक बाबतीत नेहमी कार्यमग्न रहायला पाहिजे.[3] यावरून त्यांची शिक्षणाविषयीची तळमळ सिद्ध होते.

अलाहाबाद येथे सन 1934 मध्ये विद्यापीठाच्या पदवीदान समारंभाप्रसंगी बोलतांना नेहरु म्हणतात की, ''पदवीदान समारंभास उपस्थित असलेल्या मुली आणि महिलांनी आपला अभ्यासक्रम पूर्ण केला, पदवी घेतली आणि मोठ्या क्षेत्रात विविध कार्य करण्यासाठी त्या सज्ज झाल्या आहेत. या अफाट विश्वात कोणते ध्येय त्यांच्यासमोर असेल ? कुठली आंतरिक ऊर्मी त्यांच्या वाटचालीची दिशा ठरवेल आणि त्यांच्या कृती नियंत्रित करेल? मला वाटतं बहुधा यातील बऱ्याच जणी चार भिंतीच्या आड घरातच रोजच्या कामात अडकून पडतील. आपल्या ध्येयांचा, कर्तव्यांचा त्या क्वचितच विचार करू शकतील. काही केवळ उपजीविकेचाच विचार करतील. ह्या दोन्ही गोष्टी आवश्यक आहेत त्याबद्दल शंकाच नाही. परंतु ह्या विद्यापीठाने जर आपल्याला एवढेच शिकवले असेल तर मूळ उद्देश साध्य करण्यातच हे विद्यापीठ अपयशी ठरेल असे म्हणावे लागेल. कारण विद्यापीठाला आपल्या असण्याचा अर्थ सिद्ध करून द्यावयाचा असेल तर सत्य, स्वातंत्र्य आणि न्याय यांच्या रक्षणासाठी दडपशाही आणि वाईटाच्या विरोधात निर्भयपणे सर्वकष संघर्ष करू शकतील असे प्रशिक्षित योद्धे घडवून बाहेरच्या जगात पाठवायला हवेत. तुमच्यातील काही जणींमध्ये हे धैर्य असावं असं मी मानतो. काहींना निश्चितच डोंगरावर चढणं, जोखिम घेणं, धोके पत्करणं व त्याचबरोबर धुवाऱ्यानं भरलेल्या खतरनाक दऱ्याखोऱ्यात रहायलाही आवडत असते. परंतु आपली विद्यापीठे डोंगरावर चढायला उत्तेजन देत नाहीत. सपाट जागा आणि सुरक्षित दऱ्या यांनाच ते प्राधान्य देतात. पुढाकार घेणं, स्वातंत्र्याचा आनंद घेणं या गोष्टींना आपली विद्यापीठे प्रोत्साहन देत नाहीत.[4] हेही नेहरुंनी स्पष्ट केले.

इ.स.1955 मध्ये पंडित नेहरुंनी मद्रास येथे महिला महाविद्यालयात स्त्री शिक्षणावर भाषण दिले. या भाषणात त्यांनी स्त्री शिक्षणाची तुलना जबाबदार जागरूक पालकांच्या अपत्यसंगोपनाशी केली आणि म्हणूनच सामाजिक समतेसाठी स्त्री शिक्षणाविषयी नेहरुंची भूमिका ही आग्रही होती. आपल्या शासनकाळात त्यांनी इ.स. 1958–59 मध्ये स्त्री शिक्षणाकरिता एक स्वतंत्र अशा राष्ट्रीय आयोगाची नियुक्ती केली होती. तसेच शिक्षण मंत्रालयात राष्ट्रीय कौन्सिल उभारले.[5] शासकीय यंत्रणेच्या अकर्तबगारपणामुळे त्यांना यश आले नसले तरी नेहरुंचा प्रयत्न स्तुत्य असल्याचे दिसते.

''निर्भय बना, मग बाकी सारे आपोआपच तुमच्याकडे चालत येईल.''[6] या इंदिराजीस केलेल्या उपदेशातूनही भारतीय स्त्रियांना आपल्या प्रागतिक वाटचालीतून प्रेरणा मिळाल्याशिवाय रहात नाही.

भारतीय स्त्रीची शैक्षणिक जडणघडण ही नुसतीच औपचारिक नसते तर त्यात संस्कारक्षमताही असते. नेहरुजी हे कमला नेहरुंविषयी म्हणत की, तिला औपचारिक शिक्षण नव्हते. तरीही आधुनिकतेच्या सर्व प्रगल्भता त्यांच्या वागण्यातून दिसत. ती भारतीय स्त्री म्हणून संवेदनशील आणि स्वाभिमानी तर होतीच परंतु त्याबरोबर ती निर्णयक्षमतेतून चतुर होती.[7]

### *स्त्रियांचा दर्जा*

पं. नेहरु स्त्रियांच्या कर्तबगारीवर विश्वास व्यक्त करतांना म्हणत की निम्म्याहून अधिक संख्या असलेल्या स्त्रिया जर अज्ञानी आणि अशिक्षित राहिल्यात तर राष्ट्राची उभारणी कशी करता येईल. माताच जर सक्षम व स्वावलंबी नसल्यात तर राष्ट्राच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावणारे तरुण कसे निर्माण होतील.[8] स्त्रियांमध्ये नव्या पिढीला घडविण्याची क्षमता असण्याचा गौरव करत असतांनाच नेहरुंजींनी स्त्रियांना आईपणा पलीकडचा सन्मान नसल्याचा खेदही व्यक्त केला आहे.[9]

इ.स.1928 च्या उन्हाळ्यात इंदिरा हिमालयात मसूरीला होती. ह्यावेळी त्यांचे वय अवघे दहा वर्षाचे होते. अलाहाबाद येथून पंडित नेहरुंनी आपल्या कन्येस पाठविलेल्या पत्रातही स्त्रियांच्या कर्तृत्वाविषयी उल्लेख केला आहे. ते म्हणतात की, गतकाळातील थोर पुरुष व स्त्रिया यांच्या चरित्रातून पुष्कळ गोष्टी शिकण्याचा प्रत्येकाने प्रयत्न केलाच पाहिजे.[10]

आपल्या इतिहासात, अनेक विदुषी सत्यासाठी प्राणाची बाजी लावणाऱ्या स्त्रियांची परंपराच होवून गेली. त्यांचा आपण वारसा सांगतो, प्रेरणा घेतो, तरीही स्त्रियांची स्थिती मात्र चांगली नाही. याचे कारण देतांना नेहरु आपल्या पुरुषसत्ताक व्यवस्थेला दोष देतात. ते म्हणतात की, आपली सभ्यता, आपल्या प्रथा, कायदे हे सर्व पुरुषांनी तयार केले आहेत. म्हणूनच पुरुषाने आपले श्रेष्ठत्व अबादीत ठेवून स्त्रीला एक वस्तू किंवा साधन म्हणून गौणत्व दिले. यामुळेच स्त्रियांची क्षमता पूर्णपणे विकसित झाली नाही.

पाश्चिमात्यांच्या स्वातंत्र्य लढ्यांमध्ये स्त्रियांनी मोठे यश संपादन केल्याचा इतिहास आपणांस माहीत आहे. आपल्या मागासलेपणावर मात करण्याची आकांक्षा स्त्रियांमध्ये असतांनाही आपण ते नष्ट करू शकलो नाहीत.

याकरिता आपल्याला अनेक सामाजिक कुप्रथांविरुद्ध संघर्ष करावा लागेल. शतकानुशतके चालत आलेल्या आणि स्त्रियांना गुलामगिरीत जखडणाऱ्या, प्रगतीतील अडसर असणाऱ्या प्रथांच्या शृंखला तोडाव्या लागतील. स्त्रिया आणि पुरुष झाडाझुडपांसारखे, पाना–फुलांसारखे स्वातंत्र्याच्या प्रकाश आणि ताजी हवा यातच विकसित होऊ शकतात. अन्यायी सत्तेच्या अंधःकारात त्यांचा श्वास गुदमरतो, ते कोमेजून जातात.

आपण सर्वप्रथम आपल्या देशाला परदास्यांच्या शृंखलेतून मुक्त करायला हवे. आपल्यावरची अनेक ओझी आपण उतारण्यास सिद्ध झाले पाहिजे. अशी देशबांधवांना जाणीव करून देत असतांनाच स्त्रियांनी मात्र जास्त परिश्रम घ्यायला हवेत. कारण त्यांना दुहेरी गुलामगिरीतून मुक्त व्हावयाचे आहे. एक म्हणजे पारतंत्र्य आणि दुसरी गुलामगिरी

पुरुषांनी निर्माण केलेल्या प्रथा–परंपरा होत. गुलामगिरी विरुद्धचा लढा मात्र स्त्रियांनाच लढावा लागेल. बहुधा याबाबतीत पुरुष त्यांना मदत करणारही नाहीत.

स्त्रियांच्या स्वातंत्र्य अंदोलनातील योगदानावर त्यांचा विश्वास होता. स्त्रियांच्या ताकदीची जाणीवही नेहरुंना झाली होती. इ.स.1930 मध्ये ज्यावेळी म. गांधीजींच्या नेतृत्वात सविनय कायदेभंग चळवळ सुरू झाली त्यावेळी आम्ही अनेक नेते तुरुंगात होतो. परंतु चळवळ मात्र थांबली नाही कारण चळवळीचे नेतृत्व महिलांनी स्वीकारले होते. महिलांनी ब्रिटिशांविरुद्ध संघटित शक्ती दाखविली, त्यात सर्व स्तरातील महिलांचा सहभाग होता. त्यांनी सरकारविरुद्ध मोठी निदर्शने केलीत; पोलिसांचा लाठीहल्ला सहन केला. हे मी विसरू शकत नाही. महिलांचे साहस ऐकून आमचे हृदय व डोळे भरून आले होते. या संघर्षात कमलाने महत्त्वाची भूमिका बजावली होती. अनुभवी महिला म्हणून तिने अलाहाबादच्या लढ्याचे नेतृत्व केले. तिच्या ताकदीने आणि शौर्याने ती अलाहाबादची एक मानबिंदू ठरली, हे नेहरुजींचे उद्‌गार म्हणजे स्त्रीकर्तृत्वावर त्यांचा असलेला विश्वास होय. यातूनच राष्ट्र उभारणीत स्त्रियांचा दर्जा काय व किती महत्त्वाचा होता याची जाणीव स्पष्ट होते.[11]

## *स्त्रियांच्या दर्जा सुधारणेकरिता केलेले प्रयत्न*

नेहरुंना आधुनिक भारताचे शिल्पकार मानले जाते. केवळ विज्ञान आणि तंत्रज्ञान, शिक्षण यात लक्ष घालण्यापुरता त्यांचा आधुनिक दृष्टिकोन मर्यादित नव्हता. स्त्रियांचा दर्जा सुधारावा या दृष्टीनेही त्यांचे विचार आणि प्रयत्न महत्त्वाचे ठरतात. आपल्या देशात स्वातंत्र्यपूर्वकाळात स्त्रियांचा कुटुंब व समाजातील दर्जा आणि अधिकाराबाबतच्या प्रश्नांवर विचारविनिमय करण्यात आले होते. यात वारसा हक्क, दत्तक घेण्याचा हक्क,घटस्फोट, विवाहाचे वय या बाबींचा समावेश होता.

इ.स.1941 मध्येच स्त्रियांचा दर्जा सुधारण्यासाठी सर बेनेगल रॉ. समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने महिलांच्या प्रश्नांवर विचारविनिमय करून हिंदू कायदेसंहिता तयार करण्याची शिफारस केली होती. परंतु याचवेळी 'चलेजाव' आंदोलनाचा लढा सुरू झाल्यामुळे हिंदू कायदेसंहितेविषयी प्रयत्न झाले नाहीत. असे असले तरी राष्ट्रीय आंदोलनात पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांच्या सहभागामुळे त्यांचा दर्जा सुधारणेकडे लक्ष वेधले गेले. म्हणूनच पुढे नेहरुजींनी आपल्या मंत्रिमंडळातील कायदा मंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना स्त्रियांचा दर्जा सुधारण्याच्या कार्यात पाठिंबा दिला. घटनेतील 14 व 15 व्या कलमानुसार समान हक्क व संधी होतीच, तरीही डॉ. आंबेडकरांनी हिंदू विधिसंहितेत फेरबदल करून विधेयक घटना समितीपुढे मांडले. घटना समितीने विरोध केला. स्त्रियांना समान संधी–अधिकार द्यावा हे स्वतःला गांधीवादी म्हणवून घेणाऱ्या काही काँग्रेस सदस्यांनाच मंजूर नव्हते. हिंदू समाजव्यवस्थेला धोका निर्माण होईल म्हणून समाजातील सनातनी आणि पुराणमतवाद्यांनी विरोध केला. यांच्यात सरदार पटेल, डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्यासारखे मोठे नेते असल्यामुळे विधेयक मागे पडले. पुढे इ.स.1950 सरदार पटेलांचा मृत्यू झाला तरी राष्ट्रपती म्हणून डॉ. राजेंद्र प्रसादांचा विरोध होताच म्हणून या विधीसंहितेतील प्रत्येक तरतुदींसाठी स्वतंत्र कायदे करण्याचे ठरवून 1954 चा स्पेशल मॅरेज ॲक्ट, 1955 मधील हिंदू विवाह कायदा, 1956 हिंदू वारसा हक्क कायदा, हिंदू दत्तक व पोटगी कायदा असे कायदे पास करून नेहरुंच्या शासन काळात स्त्रियांचा सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक दर्जा उंचावण्याचा स्तुत्य प्रयत्न केला गेला.[12]

## *नेहरुंच्या कार्याचे मूल्यमापन*

स्वातंत्र्योत्तर भारतात पंडित नेहरुंच्या शासनकाळात स्त्रियांचा दर्जा उंचावण्यासाठी जे प्रयत्न झालेत त्याविषयी स्त्रीवादी अभ्यासक आणि विचारवंताची मते पाहिली तर ती सहज टोकाची भूमिका घेणारी वाटतात.

1) भारतीय घटनेने 15 व्या कलमानुसार स्त्रियांना एकीकडे समान हक्क बहाल केले. पण त्याचवेळी 'स्त्रिया आणि मुले' अशा चौकटीत विशेष संरक्षणाची गरज नोंदविली. याचा अर्थ स्त्रियांचा दर्जा उंचावण्याची जबाबदारी ही शासनसंस्थेची येते, पुरुषसत्ताक परिस्थितीतील दोष घालविणे हा खरे तर उपाय सोडून स्त्रियांच्याच दुर्बलतेला दोष दिला गेला.
2) नेहरुंचा विशेष विवाह कायदा (आंतरधर्मीय, आंतरजातीय विवाहांना मान्यता देणारा कायदा), घटस्फोट, संपत्ती, दत्तक यासंदर्भातील कायद्यांविषयी डॉ. वीणा मुजुमदारांसारख्या स्त्रीवादी विचारवंताचे फारसे समाधान झाले नसले तरी प्रस्थापित समाजव्यवस्थेत क्रांतिकारी बदल घडवून आणण्याचा नेहरु शासनाचा प्रयत्न मोठीच मजल गाठणार होता हे निर्विवाद सत्य आपणांस स्वीकारावे लागेल.
3) अपर्णा महंताच्या मते नेहरु काळात धर्माच्या पायावर वेगवेगळे समाज कल्पून मुस्लिम स्त्रियांचे दुय्यमत्व उभे केले गेले. सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रात हस्तक्षेप न करण्याचीच ब्रिटिश नीती स्वीकारली व त्या त्या धर्मापुरते भिन्न कायदे करून लोकशाही व समाजवाद ह्या संकल्पना हास्यास्पद ठरविल्या. तर कायद्याच्या अभ्यासक असलेल्या स्त्रीवादी विचारवंत लतिका सरकार यांनी केवळ हिंदू बिलाचा आग्रह न धरता सर्व धर्मातील स्त्रियांना उपकारक कायदे करायला हवे होते असा आग्रह धरला.

या वैचारिक वाटचालीत नेहरुंची भूमिका जास्त स्तूत्य का वाटत नाही याची आपण पडताळणी केली तर नुसताच विचार मांडणे हे सहज शक्य असते. परंतु तो विचार प्रत्यक्षात रुजवणे त्या राजकीय नेत्याला / शासनकर्त्याला

लोकशाही प्रक्रियेमध्ये समाजमताच्या सहकार्याशिवाय शक्य नसते. समाजमताच्या पाठिंब्याशिवाय प्रयत्न करणं हे लोकशाही मूल्यांमध्ये बसत नाही, ती प्रवृत्ती हुकुमशहाची संबोधली जाते. नुसत्याच हिंदू कोडबीलाला सुद्धा राष्ट्रपती पदावर असलेल्या डॉ. राजेंद्रप्रसाद पासून ते सरदार वल्लभभाई पटेलांपर्यंतचा विरोध होता तर सर्वसामान्य लोकांचा वेगळाच ? म्हणूनच तर डॉ. आंबेडकरांना कायदामंत्री पदाचा राजीनामा द्यावा लागला. सामाजिक जाणिवा, प्रगल्भता आणि वैचारिक सुबद्धता नसतांना एकदम सर्वच धर्मातील स्त्रियांकरिता कायदे करणे हे तरी कसे शक्य होते. समाजातील अवनत परंपरा ह्या सामाजिक जाणिवांतूनच दूर करता येतात. याला कायद्याचा फक्त आधार असावा लागतो, याची जाणीव ठेवून विचारवंतांनी आणि अभ्यासकांनी चिकित्सा करायला हवी असे मला वाटते.

***संदर्भ :***


1).देवरे डॉ. पी. डी. व इतर, आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव.
2.कुलकर्णी रत्नाकर अनंत (प्रकाशक), पंडित नेहरुंची इंदिरेस पत्रे, पुणे.
3.नेहरू जवाहरलाल, रोझ पेटलस, बॉम्बे ऑक्सफड युनिव्हर्सिटी, प्रेस 1989, पृ. 64.
4.पंडित नेहरूंचे भाषण, प्रयाग महिला विद्यापीठ, अलाहाबाद –20 जाने. 1934.
5.भागवत विद्युत, भारतातील स्त्री चळवळ : समतेच्या संदर्भात, प्रतिमा प्रकाशन, पुणे –2004, पृ. 246
6.वैशंपायन डॉ.मीना(अनुवादक )नेहरूंचे विचारधन, रोहन प्रकाशन, पुणे, पृ.20.
7.नेहरू जवाहरलाल, उपरोक्त, पृ. 122.
8.तत्रैव, पृ.64.
9.भागवत विद्युत, उपरोक्त, पृ. 246.
10.कुलकर्णी रत्नाकर अनंत (प्रकाशक), उपरोक्त, पृ.114.
11.नेहरु जवाहरलाल उपरोक्त, पृ.64.
12.तत्रैव, पृ.65.





***अनिल माणिकराव बैसाणे***
माजी इतिहास विभाग प्रमुख, झेड् बी. पाटील कॉलेज,
देवपूर, धुळे .

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.org